जा.क्र:- नाजिसुरमं/अध्यक्ष/वि.भ.२०२२/१९०९
नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक.
१ ला मजला, झंन्कार हॉटेल गंजमाळ बस स्टॉप,
कामगार न्यायालयाजवळ, नाशिक ४२२ ००१.
दूरध्वनी क्र : ०२५३-२५९००३१.
दिनांक : ०३/०८/२०२२

## आदेश

**विषय :-सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदीत सुट प्राप्त सुरक्षा रक्षक/मुख्य सुरक्षा रक्षक/सुरक्षा पर्यवेक्षक यांचे विषेशभत्ता/महागाई भत्त्यामध्ये दि. ०१.०७.२०२२ पासून सुधारणा बाबत..**

**संदर्भ :** कामगार उप आयुक्त, (ग्रा.वि.) मुंबई यांचे पत्र क्र. ग्रा.वि. / कि.वे.अ. / वि.भ. / २०२२(२) / कार्या-१०/२१८३६ दि. ०१.०८.२०२२ रोजीचे पत्र.

नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळातील नोंदणीकृत **सुट प्राप्त** सुरक्षा रक्षकांचे वेतन निश्चित करण्याचे अधिकार " **महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) योजना (सुधारीत)** २००२ **मधील खंड ३० मध्ये**" नमूद करण्यात आलेले आहेत. त्यानुसार मंडळातील सुरक्षा रक्षकांच्या वेतनासाठी किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत **"दुकाने व व्यापारी आस्थापना"** या रोजगारासाठी पुनर्निर्धारित करण्यात आलेले किमान वेतनाचे दर आधारभूत प्रमाण मानून मंडळाने यापूर्वी मान्य केलेले आहेत. त्यानुसार उक्त अनुसुचित उद्योगधंद्यासाठी शासनाने वेळोवेळी जाहीर केलेला विषेश भत्ता मंडळातील नोंदीत सुरक्षा रक्षकांना वेळोवेळी लागू करण्यात येत आहे.

क्र. ग्रा.वि. / कि.वे.अ. / वि.भ. / २०२२(२) / कार्या-१०/२१८३६ किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत खालील अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता विशेष भत्त्याची रक्कम दि. ०१.०७.२०२२ ते दि. ३१.०७.२०२२ या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेली आहे. त्यानुसार "**दुकाने व व्यापारी आस्थापना**" या अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता **दि. ०१.०७.२०२२ ते ३१.१२.२०२२** या कालावधीकरिता जाहीर करण्यात आलेले विशेष भत्त्याचे दर नाशिक जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ, नाशिक या मंडळाच्या नोंदणीकृत सुट प्राप्त सुरक्षा रक्षक/ मुख्य सुरक्षा रक्षक /सुरक्षा पर्यवेक्षक यांना लागू राहतील.

**सुट प्राप्त सुरक्षा रक्षकांना दि. ०१.०७.२०२२ पासून ते ३१.१२.२०२२ पर्यंत सुधारीत महागाई भत्त्यासह लागू करण्यात आलेले वेतन व भत्ते**

| अ.क्र. | पद | मुळवेतन | विषेशभत्ता/ महागाईभत्ता | घरभाडेभत्ता (३+४) ५% | प्रवास भत्ता | धुलाई भत्ता | शैक्षणीक भत्ता | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | सुरक्षा पर्यवेक्षक | ११६३२ | २१०६ | ६८७ | १३०० | २९४ | ३०० | १६३१९ |
| २ | मुख्य सुरक्षा रक्षक | १०८५६ | २१०६ | ६४८ | १३०० | २९४ | ३०० | १५५०४ |
| ३ | सुरक्षा रक्षक | १००२१ | २१०६ | ६०६ | १३०० | २९४ | ३०० | १४६२७ |

..२..